MHYA150001512025

दाखल तारीख : १३/०२/२०२५.

नोंदणी तारीख : १४/०२/२०२५.

निकाल तारीख : १८/०४/२०२६.

कालावधी : ०१ व. ०२ म. ०४ दि.

## दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नेर, जि. यवतमाळ

## यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी श्री. जी. सी. फुलझळके)

नियमित दिवाणी दावा क्र.३/२०२५. निशाणी क्र.१८/अ

१. **भानुदास धनराज राठोड,** )<br>
वय – ४७ वर्षे, व्यवसाय – शेती, )<br>
२. **सौ. सुषमा भानुदास राठोड,** )<br>
वय – ४३ वर्षे, व्यवसाय – शेती, )<br>
दोघे रा. वाई पारस, )<br>
ता. नेर, जि. यवतमाळ. ) .. **वादी**

विरुध्द

१. **करण शंकर राठोड,** )<br>
वय – २४ वर्षे, व्यवसाय – शेती )

२. **विशाल शंकर राठोड,** )<br>
वय –२८ वर्षे, व्यवसाय – शेती, )

रा. वाई पारस, )<br>
ता. नेर, जि. यवतमाळ. ) .. **प्रतिवादी**

-----------------------------------

**प्रतिनिधित्व –**

**वादींतर्फे विद्वान विधीज्ञ – श्री. बी. जी. चौधरी.**

**प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे – दावा एकतर्फा.**

---

## न्यायनिर्णय

**(दिनांक १८/०४/२०२६ रोजी पारित.)**

प्रस्तुतचा दावा निरंतर ताकिदीच्या हुकुमाकरिता व ताब्याकरीता दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे** –

२. मौजे वाई पारस येथील शेत जमीन मिळकत गट क्र.२२१, क्षेत्रफळ ३ हे. ३ आर. आकार रुपये ४.०० पैसे ह्या मिळकतीच्या चतुःसिमा खालील प्रमाणे आहेत.

पुर्वेस – वाई ते चिकणी रस्ता.

पश्चिमेस – शेत गट क्र.२२२.

उत्तर – शेत गट क्र.२२०.

दक्षिणेस – शिवाडी व शेत गट क्र.६.

(वरील मिळकतीस यापुढे सोयीसाठी 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

## वादींचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे –

३. दावा मिळकत वादींच्या संयुक्त मालकीची आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन असलेले शेत गट क्र.६ ही प्रतिवादींच्या मालकीचे असुन ते वादींच्या शेताच्या शिवाडीला लागुन आहे. वादींनी वाद मिळकतीच्या संदर्भाने मोजणी करण्याकरीता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे अर्ज सादर केला होता. सदरच्या अर्जावरुन दिनांक ०८.०३.२०२२ रोजी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यांनी प्रत्यक्ष मोक्यावर येऊन कायदेशीररित्या वाद मिळकतीचे मोजमाप केलेले असुन त्या संदर्भाचे मोजणी मोरक क्र.२२७१ निशाणी हद्द कायम २०२१ अन्वये मोजणी पुर्ण केलेली आहे. मोजणीच्या संदर्भाने वादींना संबंधित विभागामार्फत क–प्रत प्राप्त झालेली असुन त्या क प्रतीप्रमाणे वादींना असे निदर्शणास आले की, प्रतिवादींनी वादींच्या शेतजमिनीवर २० आर क्षेत्रफळाच्या जागेवर अतिक्रमण केलेले असुन शेत गट क्र.२२० च्या शधारकाने १६ आर. क्षेत्रफळाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. तसेच शेत गट क्र.२२२ च्या धारकाने २४ आर पावेतो अतिक्रमण केलेले आहे.

४. सदरच्या मोजणी प्रमाणे वादींनी शेत गट क्र.२२० व २२२ यांना शेतजमीचा प्रत्यक्ष ताबा मागितला असता त्यांनी त्या मोजणीच्या नकाशाप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्रफळाचा ताबा दिला. परंतु, प्रतिवादींनी अतिक्रमण हटवुन शेत जमिनीचा मोजणीप्रमाणे ताबा दिलेला नाही. प्रतिवादी यांच्या ताब्यामध्ये २० आर. क्षेत्रफळाचे शेतजमीन असुन प्रतिवादी त्याचा वापर बेकायदेशीरपणे करीत आलेले आहे. सदरच्या अतिक्रमीत शेतजमिनीस मोजणी नकाशामध्ये इंग्रजी

अक्षर जे.के.एल.एम.ज. अक्षराने दर्शविलेले आहे.

५. वाद शेतजमीन मोजणी प्रमाणे देण्याचे प्रतिवादींवर बंधनकारक असतांना प्रतिवादींनी वादींना वाद शेत जमिनीचा ताबा दिलेला नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळावर अतिक्रमण करुन शेतजमीनीचा उपभोग घेत असुन व वादींना उत्पन्नापासुन वंचीत ठेऊन नुकसान पोहचवित आहे व स्वतः उत्पन्न घेऊन स्वतःचा गैरलाभ करीत आहे, त्यामुळे वादींना प्रस्तुत दावा कायदेशीर मागणी करीता प्रतिवादींचे विरुद्ध दाखल करावा लागत आहे. शेवटी वादींनी दावा मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

६. समन्सची बजावणी होवुन देखील प्रतिवादी क्र.१ व २ हजर झाले नाही. सबब, दिनांक २४.०६.२०२५ रोजी निशाणी क्र.१ वर पारीत करुन दावा प्रतिवादी क्र.१ व २ विरुध्द 'एकतर्फी' चालविण्यात आला.

७. वादींतर्फे विद्वान वकील श्री. बी. जी. चौधरी यांचा युक्तीवाद ऐकला.

८. प्रतिवादींतर्फे युक्तीवादाकरीता कोणीही हजर राहीलेले नाही.

९. दाव्यातील कथने लक्षात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले असुन, त्यांचे निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी असे सिध्द करतात काय की, दावा | |

| | | |
|---|---|---|
| | मिळकत त्यांच्या संयुक्त मालकीची व ताब्यातील आहे ? | होय. |
| २. | वादी असे सिध्द करतात काय की, प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये दक्षिण भागाकडुन ० हे. २० आर. क्षेत्रावर अतिक्रमण केले आहे ? | होय. |
| ३. | वादींनी केलेल्या मागणीनुसार दावा मिळकतीमधील अतिक्रमीत ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळाच्या शेतजमीनीचा ताबा मिळण्यास वादी पात्र आहेत काय ? | होय. |
| ४. | वादी हे नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? | दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २० नियम १२ (१) अन्वये स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. |
| ५. | आदेश आणि हुकुमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**वादींचा पुरावाः–**

१०. वादींनी दाव्याच्या कथनांच्या समर्थनार्थ खालील तोंडी पुरावा सादर केला आहे.

| अनु. क्र. | साक्षीदारांचे नाव | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | भानुदास धनराज राठोड. | १०. |
| २. | सिद्धेश्वर जगन्नाथराव सारडे. | १६. |

११. वादींनी दाव्यातील कथनांच्या समर्थनार्थ खालील कागदपत्रे दाखल केली आहेत.

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८.०३.२०२२ रोजीच्या मोजणी नकाशाची 'क' प्रत. | ११. |
| २. | दावा मिळकतीच्या सातबारा उता–याची प्रत. | १२. |
| ३. | प्रतिवादींच्या गट क्र.६ च्या सातबारा उता–याची प्रत. | १३. |

१२. वादींनी निशाणी क्र.१७ वरील पुरसिसनुसार त्यांचा पुरावा बंद केला.

१३. वादी क्र.१ यांनी पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१० वर दाखल केले. तसेच वादींनी त्यांच्यातर्फे साक्षीदार क्र.२ म्हणुन मोजणी अधिकारी सिद्धेश्वर सारडे यांना निशाणी क्र.१६ वर तपासले. प्रतिवादींनी वादी क्र.१ व त्यांचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांचा उलटतपास घेतलेला नाही. प्रतिवादींनी कैफीयत देखील सादर केली नाही व कोणताही पुरावा दिलेला नाही. वादींचे दाव्यातील कथन विना आव्हानित राहिलेले आहेत. प्रतिवादींतर्फे

पुरावा सादर करण्यात आला नाही.

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत** :–

१४. वादींनी त्यांच्यातर्फे वादी क्र.१ यांच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१० वर सादर केले. शपथपत्रातील कथन वर नमुद केलेल्या दाव्यातील कथनांप्रमाणे असल्याने व दाव्यातील कथन वर सविस्तरपणे नमुद केलेले असल्यामुळे सदर शपथपत्रातील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी ते संपुर्ण कथन पुन्हा येथे सविस्तरपणे नमुद करीत नाही.

१५. वादींच्या कथनानुसार दावा मिळकत त्यांच्या संयुक्त मालकीची असुन ताब्यात आहे. दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन असलेले शेत गट क्र.६ ही प्रतिवादींच्या मालकीचे असुन ते वादींच्या शेताच्या शिवाडीला लागुन आहे. वादींनी वाद मिळकतीच्या संदर्भाने मोजणी करण्याकरीता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यांच्याकडे अर्ज सादर केला होता. सदरच्या अर्जावरुन दिनांक ०८.०३.२०२२ रोजी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालय येथील अधिकारी यांनी प्रत्यक्ष मोक्यावर येऊन कायदेशीररित्या वाद मिळकतीचे मोजमाप केलेले असुन त्या संदर्भाचे मोजणी मोरक क्र.२२७१ निशाणी हद्द कायम २०२१ अन्वये मोजणी पुर्ण केलेली आहे. मोजणीच्या संदर्भाने वादींना संबंधित विभागामार्फत क–प्रत प्राप्त झालेली असुन त्या क प्रतीप्रमाणे वादींना असे निदर्शणास आले की, प्रतिवादींनी वादींच्या शेतजमिनीवर २० आर क्षेत्रफळाच्या जागेवर अतिक्रमण केलेले असुन शेत गट क्र.२२० च्या शधारकाने १६ आर. क्षेत्रफळाच्या जागेवर अतिक्रमण केले. तसेच

शेत गट क्र.२२२ च्या धारकाने २४ आर पावेतो अतिक्रमण केले.

१६. सदरच्या मोजणी प्रमाणे वादींनी शेत गट क्र.२२० व २२२ च्या धारकांना शेतजमीचा प्रत्यक्ष ताबा मागितला असता त्यांनी त्या मोजणीच्या नकाशाप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्रफळाचा ताबा दिला. परंतु, प्रतिवादींनी अतिक्रमण हटवुन शेत जमिनीचा मोजणीप्रमाणे ताबा दिलेला नाही. प्रतिवादींच्या ताब्यामध्ये ० हे. २० आर. क्षेत्रफळाचे शेतजमीन असुन प्रतिवादी त्याचा वापर बेकायदेशीरपणे करीत आलेले आहेत. सदरच्या अतिक्रमीत शेतजमिनीस मोजणी नकाशामध्ये इंग्रजी अक्षर जे.के.एल.एम.जे. अक्षराने दर्शविलेले आहे. वाद शेतजमीन मोजणी प्रमाणे देण्याचे प्रतिवादींवर बंधनकारक असतांना प्रतिवादींनी वादींना वाद शेत जमिनीचा ताबा दिलेला नाही.

१७. वादींचे साक्षीदार क्र.२ सिद्धेश्वर सारडे यांचा पुरावा निशाणी क्र.१६ वर सादर केला. सदर साक्षीदार क्र.२ यांनी सरतपासात नमुद केले की, ते सन २०२१ ते मे २०२२ च्या दरम्यान भुमापक या पदावर उपअधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय नेर येथे कार्यरत होते. त्यांच्या कार्यालयामध्ये मौजा चिकणी येथील गट क्र.२२१ च्या मिळकतीच्या हद्दकायम मोजणीचा अर्ज प्राप्त झाला होता. त्यांच्या कार्यालयामार्फत अर्जदार व मोजणी बाबतच्या गट क्र.२२१ च्या शेताच्या लगत असलेल्या मिळकतीच्या भुधारकांना नोटीस काढल्या होत्या.

१८. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, त्यांनी मोजणीच्या अनुशंगाने सातबारा उता−या दस्त, आकारबंद पत्रक, टिपन उतारे व शेताचा नकाशा इ. दस्तऐवज कार्यालयातुन प्राप्त केले होते.

दिनांक ०८.०३.२०२२ ही मोजणीची तारीख ठरविण्यात आली होती. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, सदर दिवशी ते मौजा चिकणी येथे गट क्र.२२१ च्या मिळकतीमध्ये गेले होते. ते मोजणीच्या वेळी इ.टी.एस.मशीन व संबंधित दस्तऐवज नेले होते. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, ते प्रत्यक्ष मोक्यावर गेले त्यावेळी गट क्र.२२१ च्या लगत असलेल्या मिळकतीच्या धारकांना मोजणीबाबत सुचित केले होते. सदर मोजणीच्या दिवशी अर्जदार भानुदास धनराज राठोड, गजानन विश्वनाथ लावरे, प्रकाश हरीभाऊ लावरे, प्रदिप रामभाऊ लावरे व उद्धव दुर्योधन बोरकर हे उपस्थित होते. सदर साक्षीदार मोजणी अधिकारी यांनी कच्चा नकाशा तयार केल्याचे नमुद केले. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, अर्जदार व गट क्र.२२१ च्या लगत असलेल्या मिळकतींच्या धारकांनी दाखविल्याप्रमाणे शेताची पाहणी इ.टी.एस. मशीनद्वारे केली. इ.टी.एस. मशीनद्वारे मोजणी केल्यानंतर मुळ अभिलेखानुसार खात्री करुन गट क्र.२२१ च्या हद्दीच्या खुणा कायम करुन दिल्या.

१९. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, त्यांनी मोजणीच्या अनुशंगाने अ,ब,क ह्या मोजणीच्या नकाशाच्या प्रती तयार केल्या. त्यांनी अ–प्रत, ब–प्रत व क–प्रती कार्यालयात जमा केल्या. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी पुढे नमुद केले की, मोजणीबाबतची अ–प्रत व ब–प्रत सोबत आणल्या आहेत. सरतपासामध्ये त्यांना अभिलेखावरील निशाणी ३ वरील यादीसमवेत अनुक्रमांक १ वरील नकाशाची क–प्रत दाखविण्यात आली. साक्षीदार क्र.२ यांनी नमुद केले की,

सदरची प्रत त्यांनी आणलेल्या ब–प्रतीप्रमाणे असुन सदरच्या क–प्रतीवर मोजणी करणार म्हणुन त्यांची सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर मोजणीमध्ये साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांच्या निदर्शनात अर्जदार यांच्या गट क्र.२२१ मध्ये ६० आर. एवढे क्षेत्रफळ कमी असल्याचे आढळुण आले. सदरचे अतिक्रमीत क्षेत्र त्यांनी नकाशामध्ये इंग्रजी वर्णमालेतील बी,सी.डी,इ,एफ,बी या अक्षराने ०.१६ आर. एवढे अतिक्रमीत क्षेत्र नकाशाच्या उत्तरेला दर्शविले आहे. तसेच जे, के, एल, एम, जी या अक्षाराने ० हे. २० आर. एवढे क्षेत्र अतिक्रमीत दर्शविले आहे. तसेच एफ, इ, के, जे. एफ या अक्षराने ० हे. २४ आर. एवढे क्षेत्र अतिक्रमीत दर्शविले आहे.

२०. वादींनी निशाणी क्र.१२ वर सातबारा उता–याची प्रत सादर केली. तसेच वादींनी निशाणी क्र.११ वर मोजणी नकाशाचा दस्त सादर केला. निशाणी क्र.१२ वरील सातबारा उता–याची बारकाईने पाहणी केली असता दिसुन येते की, निशाणी क्र.१२ वरील सातबारा उतारा हा दावा मिळकतीचा आहे. सदर सातबारा उता–यामध्ये भुमापण क्रमांक व उपविभाग २२१ असे नमुद आहे. भोगवटदार वर्ग १ सदरी वादी क्र.१ भानुदास राठोड व वादी क्र.२ सुषमा राठोड यांचे नाव नमुद आहेत. सदर सातबारा उता–यामध्ये दावा मिळकतीचे क्षेत्रफळ ३ हे. ०३ आर. एवढे दर्शविलेले आहे. तसेच निशाणी क्र.११ वरील दस्ताची पाहणी केली असता दिसुन येते की, सदरचा दस्त हा गट क्र.२२१ म्हणजेच दावा मिळकतीच्या हद्द कायम मोजणी नकाशाची 'क' प्रतीचा दस्त आहे. सदरच्या प्रतीवर उप–अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय येथील अधिका–यांची सही व कार्यालयाचा शिक्का आहे. सदर नकाशाच्या 'क' प्रतीमध्ये

वादी क्र.१ भानुदास यांची ताबा वहिवाट असल्याचे नमुद आहे.

२१. तसेच वादींनी निशाणी क्र.१३ वर सातबारा उता–याची प्रत सादर केली. निशाणी क्र.१३ वरील सातबारा उता–याची बारकाईने पाहणी केली असता दिसुन येते की, निशाणी क्र.१३ वरील सातबारा उतारा हा गट क्र.६ च्या मिळकतीचा आहे. सदर सातबारा उता–यामध्ये भुमापण क्रमांक व उपविभाग ६ असे नमुद आहे. भोगवटदार वर्ग १ सदरी प्रतिवादी क्र.१ करण राठोड व प्रतिवादी क्र.२ विशाल राठोड यांचे नाव नमुद आहेत.

२२. प्रतिवादींनी वादींनी सादर केलेल्या पुराव्याला आव्हान व आक्षेप घेतले नाही. तसेच प्रतिवादींनी कैफियत देखील सादर केली नाही. अभिलेखावरील निशाणी क्र.१२ वरील सातबारा उतारा व निशाणी क्र.११ वरील हद्द कायम मोजणी नकाशा 'क' प्रतीच्या दस्तऐवजावरुन दिसुन येते की, दावा मिळकत गट क्र.२२१ चे एकुण क्षेत्रफळ ३ हे. ०३ आर. एवढे आहे व महसुल दफ्तरी वादींच्या नावाची नोंद भोगवटदार वर्ग १ या सदरी दावा मिळकतीला झाली आहे.

२३. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५७ मधील तरतुदीनुसार सातबारा उताऱ्यातील नोंदी जोपर्यंत खोडुन काढल्या जात नाहीत, तोपर्यंत त्या सत्य मानल्या जातात.

२४. अभिलेखावरील निशाणी क्र.१२ वरील सातबारा उतारा, निशाणी क्र.११ वरील हद्दकायम मोजणी नकाशा व तोंडी पुराव्यावरुन दावा मिळकतीवर वादींचा ताबा असल्याचे दिसुन येते. तसेच निशाणी क्र.१३ वरील सातबारा

उता–यावरुन दिसुन येते की, गट क्र.६ ची मिळकत प्रतिवादींच्या ताबेवहीवाटीची मिळकत आहे.

२५. येथे हे नमुद करणे महत्वाचे आहे की, वादींनी सादर केलेल्या निशाणी क्र.११ वरील हद्दकायम मोजणी नकाशाच्या 'क' प्रतीमध्ये दावा मिळकत गट क्र.२२१ च्या दक्षिण बाजुकडे अतिक्रमण झाल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदरचे अतिक्रमण हे इंग्रजी वर्णमालेतील जे, के, एल, एम या अक्षराने दर्शविले आहे. तसेच सदर नकाशामध्ये नमुद आहे की, जे, के, एल, एम या अक्षराने दर्शविलेली जागा गट क्र.२२१ ची असुन लागू शिव मौजा वाई येथील गट क्र.६ चे ताबा वहिवाटीत असल्याचे दिसून आले. सदर अतिक्रमीत जागेचे क्षेत्रफळ २० आर. एवढे आहे.

२६. वादींनी सादर केलेल्या निशाणी क्र.१३ वरील सातबारा उता–यावरुन व तोंडी पुराव्यावरुन गट क्र.६ ची शेत जमीन मिळकत ही प्रतिवादींच्या ताबेवहीवाटीची मिळकत असल्याचे स्पष्ट होते. निशाणी क्र.११ वरील मोजणी नकाशामध्ये गट क्र.६ च्या शेतजमीन मिळकतीमध्ये दावा मिळकत गट क्र.२२१ चे ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळाची शेतजमीन मिळकत आढळुण आल्याचे नमुद आहे.

२७. वादींनी मोजणी अधिकारी सिद्धेश्वर सारडे यांना साक्षीदार क्र.२ म्हणुन तपासले. सदर मोजणी अधिकारी यांनी निशाणी क्र.१६ वरील सरतपासामध्ये नमुद केले की, त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जावरुन त्यांनी दावा मिळकतीची हद्द कायम मोजणी केली. मोजणीच्या अनुशंगाने त्यांनी

सातबारा उता–याचा दस्त, आकारबंद पत्र, टीपन उतारा व शेताचा नकाशा इ. दस्तऐवज कार्यालयातुन प्राप्त केले होते, ते प्रत्यक्ष मोक्यावर गेले. त्यांनी वादी व दावा मिळकतीच्या लगत असलेल्या मिळकतीच्या भुधारकांना मोजणीबाबत सुचनापत्र दिले होते. त्यांनी इ.टी.एस. मशीनद्वारे मोजणी केली. दावा मिळकतीच्या हद्दीच्या खुणा कायम केल्या. तसेच मोजणी अधिकारी साक्षीदार क्र.२ यांनी पुराव्यादरम्यान नमुद केले की, इंग्रजी वर्णमालेतील जे, के. एल, एम, जे या अक्षराने ०.२० आर. एवढे क्षेत्र अतिक्रमीत दर्शविले. वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी यांनी हद्द कायम मोजणी नकाशाच्या 'क' प्रतीतील मजकुर खरा व बरोबर असल्याचे नमुद केले.

२८. दाव्यातील प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन ० हे. २० आर. एवढ्या दावा मिळकतीच्या क्षेत्रफळावर अतिक्रमण केलेल्या कथनास निशाणी क्र.११ वरील दावा मिळकतीच्या हद्द कायम मोजणी नकाशाद्वारे व वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी सिद्धेश्वर सारडे यांच्या पुराव्यातुन पुष्टी प्राप्त होते. निशाणी क्र.११ वरील मोजणी नकाशा हा शासकीय अधिका–याने तयार केलेला मोजणी नकाशा असल्याचे दिसुन येते. म्हणुन भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ कलम ८२ अन्वये शासकीय अधिकारी यांनी तयार केलेला नकाशा सामान्यतः खरा आणि अचुक असल्याचे गृहीत धरण्यात येते. निशाणी क्र.११ वरील मोजणी नकाशामध्ये व वादींचे साक्षीदार क्र.२ मोजणी अधिकारी सिद्धेश्वर सारडे यांच्या पुराव्यात स्पष्ट नमुद आहे की, गट क्र.६ मध्ये दावा मिळकतीचे ० हे. २० आर. एवढे क्षेत्रफळ आढळुण आले. तसेच सदर नकाशामध्ये व मोजणी अधिकारी यांच्या पुराव्यात नमुद आहे की, सदर ० हे.

२० आर. एवढे अतिक्रमीत क्षेत्र हे इंग्रजी वर्णमालेतील जे, के, एल, एम या अक्षराने दर्शविले आहे.

२९. वादी क्र.१ व वादींचे साक्षीदार क्र.२ यांचा उलटतपास घेण्याकरिता प्रतिवादी हे हजर न झाल्यामुळे उलटतपास काही नाही असा आदेश पारीत करुन प्रकरण पुढे चालविण्यात आले. वादींनी दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी खोडुन काढलेला नाही. वादींतर्फे प्रस्तुत करण्यात आलेल्या पुराव्याच्या विरोधात अगर प्रतिवादींतर्फे अभिलेखावर कोणतेही कथन मांडण्यात आलेले नाही. एकुनच वादी यांनी दाव्यामध्ये केलेल्या कथनांना आव्हान देण्यात आलेले नसल्यामुळे कथने जशीच्या तशी अबाधित राहिली.

३०. अभिलेखावरील निशाणी क्र.११ वरील मोजणी नकाशा व तोंडी पुराव्यावरुन दिसुन येते की, दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडे प्रतिवादींची गट क्र.६ ही जमीन मिळकत आहे व दावा मिळकतीच्या क्षेत्रफळापैकी ० हे. २० आर. एवढे क्षेत्रफळ प्रतिवादींच्या गट क्र.६ च्या शेतजमीन मिळकतीमध्ये आढळुण आले.

३१. वादींनी दावा मिळकतीवरील त्यांचा ताबा व मालकी असल्याचे व प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळावर अतिक्रमण केल्याचे दाव्यामध्ये नमुद केलेल्या कथनांना ज्यास कागदोपत्री पुराव्याचा दुजोरा मिळतो ती अमान्य करण्यास कोणतेही संयुक्त कारण आढळुन येत नाही. वादींनी सादर केलेल्या कागदोपत्री व तोंडी पुराव्यातुन स्पष्ट होते की, दावा मिळकत वादींच्या मालकीची व ताब्यातील आहे व दावा

मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या क्षेत्रफळापैकी ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळावर अतिक्रमण केले आहे.

३२. वर नमुद बाबींना प्रतिवादींनी कोणतेही आव्हान दिले नाही. वादींचा पुरावा अबाधित राहीला आहे. अभिलेखावरील पुरावा व वरील सर्व बाबींचा एकत्रितरीत्या विचार करता वादींनी दावा मिळकतीवर त्यांचा ताबा असल्याचे व प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळावर अतिक्रमण केल्याचे सिद्ध केल्याचे दिसुन येते. वादींनी दावामिळकतीवर प्रतिवादींनी दक्षिण बाजुकडुन ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळावर अतिक्रमण केल्याचे सिद्ध केल्यामुळे व दावा मिळकत वादींच्या मालकीची असल्याचे सिध्द झाल्यामुळे ० हे. २० आर. एवढ्या अतिक्रमीत क्षेत्रफळाचा ताबा प्रतिवादींकडुन परत मिळण्याची मागणी मंजुर होण्यास वादी पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ बाबत** :-

३३. येथे हे नमुद करणे महत्वाचे आहे की, वादींच्या कथनानुसार दिनांक ०८.०३.२०२२ रोजी दावा मिळकतीची हद्दकायम मोजणी करण्यात आली. सदर मोजणीमध्ये प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या दक्षिण बाजुकडुन ० हे. २० आर. एवढ्या क्षेत्रफळाकरीता दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले. अतिक्रमण झाल्यामुळे अतिक्रमीत शेतजमीन मिळकतीमधुन होणारे उत्पन्न वादींना मिळाले नाही व त्यामुळे वादींचे नुकसान झाले. वादींना अतिक्रमीत शेतजमीन मिळकतीच्या उत्पन्नाबाबत झालेल्या नुकसानीकरीता व प्रतिवादींना

अतिक्रमीत शेतजमीन मिळकतीच्या क्षेत्रफळामधुन झालेल्या नफ्याच्या चौकशीबाबत दिनांक ०८.०३.२०२२ रोजीपासुन ते अतिक्रमीत जागेचा प्रत्यक्ष ताबा वादींना मिळेपर्यंतच्या कालावधीकरीता नफ्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २० नियम १२ (१) अन्वये चौकशी करीता आदेश पारित करणे योग्य व रास्त असल्याचे दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.४ चे निष्कर्षामध्ये दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २० नियम १२(१) अन्वये दावा मिळकतीमधील अतिक्रमीत क्षेत्रफळामधुन प्रतिवादींना झालेल्या नफ्याबाबत स्वतंत्र चौकशी करण्याबाबत नमुद करीत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत</u>** :-

३४. दाव्याचे स्वरुप, अभिलेखावरील पुरावा व वरील विवेचनानुसार मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविल्यामुळे व मुद्दा क्र.४ चे निष्कर्षामध्ये दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २० नियम १२ (१) अन्वये दावा मिळकतीमधील वादींच्या मालकीच्या अतिक्रमीत शेतजमीन मिळकतीच्या नफ्याबाबत स्वतंत्र चौकशी करण्याबाबत नमुद केल्यामुळे दावा मंजुर होण्यास पात्र आहे. वादींनी दावा सिद्ध केल्यामुळे दावा खर्चासह मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.५ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. दावा खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी आजरोजीपासुन ते दोन महिण्याच्या कालावधीपर्यंत दावा

मिळकतीच्या दक्षिण बाजुकडील ० हे. २० आर. एवढे अतिक्रमीत क्षेत्र हटवुन अतिक्रमीत जागेचा ताबा वादींना द्यावा. प्रतिवादींनी तसे न केल्यास वादींनी हुकुमनाम्याची अमलबजावणी न्यायालयामार्फत करावी.

३. दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २० नियम १२ (१)(क) अन्वये दिनांक ०८.०३.२०२२ पासुन ते दावा मिळकतीवरील अतिक्रमीत ० हे २० आर. एवढ्या क्षेत्रफळाच्या जागेचा प्रत्यक्ष ताबा वादींना मिळेपर्यंतच्या कालावधीकरीता नफ्याबाबत स्वतंत्र चौकशी करण्यात यावी.

४. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2026.04.18 18:49:02 +0530

नेर, (जी. सी. फुलझळके)

दिनांक – १८.०४.२०२६. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर,

ता. नेर, जि. यवतमाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per the original judgment.

Name of Stenographer :- Ku. B. N. Nare (Grade-III)

Court :- Civil Judge Jr.Dn. Ner.

Date :- 18/04/2026

Judgment signed by
the Presiding Officer on :- 18/04/2026

Judgment uploaded on :- 18/04/2026